महाराष्ट्र शासन

**शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी खुर्द**

तालुका- आंबेगाव, जिल्हा - पुणे - ४१२४०५

दूरध्वनीक्र. : ०२१३३-२३०५८२ संकेतस्थळ : www.gcoeara.ac.in

ईमेल: office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in

**(स्वयंचल व यंत्र अभियांत्रिकी अभ्यासक्रम एनबीए, नवी दिल्ली मानांकित)**

जा.क्र.शाअवसंमअ/मासवि/परिपत्रक/२०२३-२४/422 दिनांक: 30 SEP 2023

**परिपत्रक :-**

महाविद्यालयातील सर्व मा. विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, विविध उपक्रम, क्लब, कार्यक्रम इत्यादींचे प्रमुख/समन्वयक यांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात/विभागात होणारे विविध विद्यार्थी केंद्रित उपक्रम, विविध स्पर्धांमधील यश, कार्यशाळांचे आयोजन इत्यादींबाबत वर्तमानपत्रात बातमी प्रसिद्धीकरिता देण्यासाठी खालील पद्धतीचा अवलंब करावा आणि त्यानुसारच बातमी/जाहिरात माध्यम समन्वय समितीकडे प्रसिद्धीसाठी देण्यात यावी.

१. बातमी/उपक्रम/कार्यक्रम इत्यादींचे संक्षिप्त स्वरुपात शिर्षक नमूद करावे.
२. बातमीमध्ये कार्यक्रमात झालेल्या उल्लेखनीय घटनांचा समावेश असावा. बातमीकरिताची माहिती आणि छायाचित्र (High quality JPEG image) हे Soft Copy स्वरुपात असावे. छायाचित्र ठळक, सुस्पष्ट व बोलके असावे.
३. कार्यक्रमांकरिता प्रमुख अतिथी आलेले असल्यास त्यांचे नाव, हुद्दा, पत्ता इ. बाबतची माहिती व त्यांनी उपस्थितांना केलेले मार्गदर्शन मुद्देसूद व सुस्पष्ट नमूद करावे. कार्यक्रमांकरिता उपस्थित विद्यार्थी/अधिकारी/कर्मचारी यांची संख्याही स्पष्टपणे नमूद करावी. तसेच मा. प्राचार्यांनी उपस्थितांना केलेले संबोधनही सुस्पष्टपणे नमूद करावे.
४. बातमी व छायाचित्र यांची Soft Copy महाविद्यालयातील माध्यम समन्वय समिती सदस्यांकडे खालील नमूद ई-मेल (E-mail) वर कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर तात्काळ पाठवावी. बातमी व छायाचित्रे उपक्रम/कार्यक्रम/कार्यशाळा संपन्न झाल्याच्या दोन दिवसांच्या आत माध्यम समन्वय समितीकडे प्राप्त न झाल्यास ती बातमी फक्त महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी पाठविण्यात येईल.
५. महाविद्यालयातील माध्यम समन्वय समिती प्राप्त झालेल्या बातमीमध्ये आवश्यक/योग्य तो बदल करून मा. प्राचार्य महोदय यांची पूर्वमान्यता घेवून सदरील बातमी विहित वेळेत वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यासाठी पाठवेल.
६. बातमी वर्तमानपत्रात प्रसिद्धीसाठी पाठवली जाणार असल्यामुळे बातमीत चुकीची माहिती नमूद करू नये.
७. जाहिरात द्यावयाची असल्यास कमीत कमी शब्दात, अर्थपूर्ण तयार करावी. तसेच कव्हरिंग लेटरवरती जाहिरात आवृत्ती (जिल्ह्यांची नावे) व जाहिरात आकार (8×7/8×8 सें.मी., इ.) स्पष्टपणे नमूद करावे.

| अ. क्र. | माध्यम समन्वय समिती सदस्यांची नावे | ई-मेल आयडी (E-mail Id) | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | प्रा. (श्रीमती) डी. बी. माहेश्वरी | dbmaheshwari.entc@gcoeara.ac.in | 8275339875 |
| २. | श्रीमती एस. बी. पालवे | surekhapalave2017@gmail.com | 7721820791 |

अधिक माहितीसाठी डॉ. एम. डी. पांचाळ (9850576352) यांचेशी संपर्क साधावा.

30-9-23

(डॉ. दिलीप रा. पानगव्हाणे)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे

**प्रत :** १) मा. विभागप्रमुख - यंत्र/स्वयंचल/स्थापत्य/संगणक/अणुविद्युत/उपकरणीकरण/उप.विज्ञान/कार्यालय/कर्मशाळा, व महाविद्यालयातील सर्व उपक्रम, कार्यक्रम, क्लब इ. चे प्रमुख यांना माहिती व कार्यावाहीसाठी.
२) DPU विभाग यांनी सदरचे परिपत्रक सर्व मा. विभागप्रमुख, अधिकारी/कर्मचारी यांना ई-मेलद्वारे पाठवावे.